जा.क्रमांक/जिपना/खाप्राशा/मान्यता/का.क्र.२५/ 6201 /२०२४
कार्यालय शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर
दिनांक 24/07/2024

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
इनोव्हेटिव्ह एज्युकेशन ट्रस्ट,
मुंबई

विषय :- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावर सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम खाते मान्यता प्रदान करणेबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२
२. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचा इरादा पत्र क्रं. एसएफएस-१०२३/प्र.क्र.२०४/एसएम-२ दिनांक १७/०४/२०२३
३. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचा इरादा पत्र क्रं. एसएफएस-१०२३/प्र.क्र.२०४/एसएम-२ दिनांक १८ जुर्ले २०२४
४. मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र माध्य/ब/स्वअर्थ/५१८२/२३ दिनाक २४ जुर्ले २०२४ अन्वये.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षामध्ये प्रथम खाते मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता. प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस वरील संदर्भिय पत्रानुसार प्रथम खाते मान्यता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येते.

| अ. क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव | मान्यता मिळालेले शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचे प्रकार नवीन शाळा दर्जा | शाळेचा प्रकार | मंडळ सलग्न | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नागपूर | इनोव्हेटिव्ह एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई | ग्लोबल इंडीयन इंटरनॅशनल स्कूल, खसरा क्र. २१५ व २१६/२, लाव्हा, कॅनरा बॅकेजवळ, ता. जि. नागपूर | इंग्रजी | नवीन शाळा | वर्ग १ ली ते ८ वी | सी.बी.एस.ई. | सन २०२४-२५ पासून |

अटी व शर्ती :-

१) सदर शाळेने बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ या अंतर्गत केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदीची पुर्तता करणे आवश्यक आहे.
२) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून असेल.
३) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.
४) परवसनगी देण्यात आपली नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा १) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही. श[illegible]ने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतीरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शास[illegible]नेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

NIDHI GUPTA
Digitally signed by NIDHI GUPTA
Date: 2025.05.22 19:20:56 +05'30'

SIVANKUTTY JANARDHANAN NAIR
Digitally signed by SIVANKUTTY JANARDHANAN NAIR
Date: 2025.05.22 19:21:26 +05'30'

६) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करीता स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविनारा फलक लावणे बंधनकारक राहील. वेळोवेळी करण्यात येणा-या पात्र व्यवहारावर स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/ वर्ग असे लिहिने बंधनकारक राहील.

७) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत प्रथम खाते मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

८) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनीयमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना यु डायस मध्ये माहिती भरतांना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणुन नोंद करणे आवश्यक राहील.

९) परवानगी दिलेल्या स्वंयअर्थसहायीत शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

शासनाने सध्या अस्तीत्वात असलेल्या प्रचलित नियम व शासन वेळोवळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावनी करणे बंधनकारक राहील.

(सिध्देश्वर काळूसे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपुर

प्रतिलीपी :-

१. मा.शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग,नागपूर यांना माहीतीस सविनय सादर.

२. मुख्याध्यापक, ग्लोबल इंडीयन इंटरनॅशनल स्कूल, खसरा क्र. २१५ व २१६/२, लाव्हा, कॅनरा बँकेजवळ, ता. जि. नागपूर यांना माहीतीस्तव अग्रेषित.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपुर

NIDHI GUPTA Digitally signed by NIDHI GUPTA Date: 2025.05.22 19:21:59 +05'30'

SIVANKUTTY JANARDHANAN NAIR Digitally signed by SIVANKUTTY JANARDHANAN NAIR Date: 2025.05.22 19:22:17 +05'30'